कृषी उन्नती योजना - राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियानांतर्गत अन्नधान्य पिकांकरीता सर्वसाधारण प्रवर्गाचा सन २०१९-२० करीता ₹ ९२२३.३१ लाख निधी वितरीत करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग
शासन निर्णय क्रमांक : असुअ-१०१९/प्र.क्र.३०/४अे
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार, मुंबई - ४०० ०३२
दिनांक : १४ जून, २०१९

संदर्भः-

१. कृषी व पदुम विभागाचा शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०१७/प्र.क्र.३१/१७-अे,दि१९/०४/२०१७
२. वित्त विभागाचे परिपत्रक क्र. अर्थसं-२०१९/प्र.क्र.४४/अर्थ-३ दि. ०१/०४/२०१९
३. कृषी, सहकार व शेतकरी कल्याण विभाग, कृषि व शेतकरी कल्याण मंत्रालय, भारत सरकार यांचे पत्र क्र. 2-16/2016-NFSM दि. १८/०४/२०१९
४. कृषी आयुक्तालयाचे पत्र क्र.कृआ/विप्र१/राअसुअ/कृआ/प्र.क्र.१/१३१/१९, दि.२४/०४/२०१९
५. कृषी आयुक्तालयाचे पत्र क्र.कृआ/विप्र१/राअसुअ/कृआ/प्र.क्र.१/१५३/१९, दि.२९/०५/२०१९
६. कृषि व पदुम विभाग शासन निर्णय क्र. अेअेपी-२०१९/प्र.क्र.२३ /४-अे, दि.०३ /०६/२०१९
७. कृषी, सहकार व शेतकरी कल्याण विभाग ,कृषि व शेतकरी कल्याण मंत्रालय ,भारत सरकार यांचे पत्र No.20-27/2017-NFSM (CA-V) , दि.०४ जून, २०१९
८. कृषी आयुक्तालयाचे पत्र क्र.कृआ/वि.प्र.१/रासअसु/निवि१९२०/प्र.क्र.१०/१६४/१९, दि.११/०६/२०१९

प्रस्तावना :-

सन २०१९-२० करिता केंद्र शासनाने राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियानांतर्गत अन्नधान्य पिकांसाठी (भात, गहू, कडधान्य व पौष्टिक तृणधान्ये) ₹ २२०१९.८१५५ लाख रकमेचा कृती आराखडा मंजूर केला असून त्यानुसार रु.२२०१९.८१५५ लाख (केंद्र हिस्सा रु.१३२११.८८९३ लाख+राज्य हिस्सा रु.८८०७.९२६२ लाख) रकमेच्या कृती आराखडयास दिनांक ०३ जून, २०१९ रोजीच्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता प्रदान केलेली आहे. सन २०१९-२० करिता केंद्र शासनाने अभियानांतर्गत पहिल्या हप्त्यात केंद्र हिस्याचा ₹६८४०.५३ लाख निधी वितरीत केलेला असून त्याप्रमाणे कृषि आयुक्तालयाच्या मागणीप्रमाणे केंद्र व राज्य हिस्स्याचा आवश्यक निधी वितरीत करण्याबाबत शासन पुढीलप्रमाणे निर्णय घेत आहे-

शासन निर्णयः

१. सन २०१९-२० करीता कृषी उन्नती योजना -राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियानांतर्गत अन्नधान्य पिकांकरीता **सर्वसाधारण प्रवर्गासाठी** केंद्र व राज्य हिस्स्याचा एकूण **₹९२२३.३१ लाख (रुपये ब्याण्णव कोटी तेवीस लाख एकतीस हजार फक्त) निधी** या शासन निर्णयान्वये आयुक्त (कृषी) पुणे, यांना अर्थसंकल्पिय वितरण प्रणालीद्वारे पिक निहाय उपलब्ध करुन देण्यात येत आहे, सदर निधीपैकी केंद्र व राज्य हिस्साच्या वितरीत निधीचे विवरण पुढीलप्रमाणे –

(रु.लाख)

अ. क्र.	राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान-अन्नधान्य पिके	सर्वसाधारण प्रवर्ग		एकूण वितरीत निधी
		केंद्र हिस्सा (६०%)	राज्य हिस्सा (४०%)	
१	भात	१४४.६७	९६.४५	२४१.१२
२	गहू	१८५.७१	१२३.८१	३०९.५२
३	कडधान्य	५०४७.७५	३३६५.१७	८४१२.९२
४	पौष्टिक तृणधान्य	१५५.८५	१०३.९०	२५९.७५
	एकूण	**५५३३.९८**	**३६८९.३३**	**९२२३.३१**

२. राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियानाकरीता उपलब्ध करुन देण्यात आलेला केंद्र हिस्याचा **₹५५३३.९८ लाख (रुपये पंचावन कोटी तेहत्तीस लाख अठ्ठयाण्णव हजार फक्त** निधी व राज्य हिस्याचा **₹३६८९.३३ लाख (रुपये छत्तीस कोटी एकोणनव्वद लाख तेहत्तीस हजार फक्त)** निधी खालील लेखाशिर्षांतर्गत सन २०१९-२० करिता अर्थसंकल्पित करण्यात आलेल्या तरतुदीतून खर्ची टाकावा.

केंद्र हिस्याचे लेखाशिर्ष	राज्य हिस्याचे लेखाशिर्ष
मागणी क्रमांक डी-३ **२४०१- पीक संवर्धन** **(००) (१०२) अन्नधान्य पिके** **(००) (२५) कृषी उन्नती योजना- राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान-अन्नधान्य पिके** **(केंद्र हिस्सा ६०%) (केंद्र पुरस्कृत योजना)** **(२४०१ ४६१४)(योजनांतर्गत) (दत्तमत)** **३३, अर्थसहाय्य**	**मागणी क्रमांक डी-३** **२४०१- पीक संवर्धन** **(००) (१०२) अन्नधान्य पिके** **(००) (३३) कृषी उन्नती योजना- राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान-अन्नधान्य पिके** **(राज्य हिस्सा ४०%) (केंद्र पुरस्कृत योजना)** **(२४०१ A२३४) (योजनांतर्गत) (दत्तमत)** **३३, अर्थसहाय्य**

३. शासन निर्णयान्वये राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियानाकरीता उपलब्ध करुन दिलेल्या एकूण ₹९२२३.३१ लाख निधी संचालक (विस्तार व प्रशिक्षण) यांनी PFMS प्रणालीद्वारे जिल्हा निहाय वितरीत करावा.

४. या शासन निर्णयान्वये उपलब्ध करुन दिलेल्या ₹९२२३.३१ लाख निधीच्या आहरणाकरिता संचालक (विस्तार व प्रशिक्षण), कृषी आयुक्तालय, पुणे यांना नियंत्रण अधिकारी आणि सहायक संचालक (लेखा-१), कृषी आयुक्तालय, पुणे यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

५. या शासन निर्णयान्वये उपलब्ध करुन देण्यात आलेल्या निधीचा तात्काळ विनियोग करण्यात यावा तसेच निधी विनियोगाच्या अनुषंगाने संचालक (विस्तार व प्रशिक्षण) यांनी वेळोवेळी उपयोगिता

प्रमाणपत्र शासनास सादर करावे. सदर उपयोगिता प्रमाणपत्राच्या आधारे सचिव (कृषी) यांच्या स्वाक्षरीने सदर निधीचे उपयोगिता प्रमाणपत्र केंद्र शासनास निर्गमित करण्यात येईल.

६. हा शासन निर्णय वित्त विभागाचे शासन परिपत्रक क्र.अर्थसं-२०१९/प्र.क्र.४४/अर्थ-३, दि. ०१ एप्रिल, २०१९ नुसार विहीत केलेल्या अटींची पुर्तता होत असल्याने तसेच, सदर परिपत्रकानुसार या विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

७. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०६१४१६०८४१३८०१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Shrikant
Chandrakant
Andge

Digitally signed by Shrikant Chandrakant Andge
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Agriculture And ADF Department, postalCode=400032, st=Maharashtra,
2.5.4.20=5d5ab93b4e4f2fcd87e12fe19b8965025d482b1bee0fffaa62085c34db6bfd8c,
serialNumber=d8d9626c9e038380cd235c048f20d7ce74cffd3a95f2ac3c192e9c991f358271, cn=Shrikant Chandrakant Andge
Date: 2019.06.14 15:53:24 +05'30'

(श्रीकांत चं. आंडगे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति:-

१. मा. मंत्री (कृषि)यांचे स्वीय सहायक ,मंत्रालय, मुंबई.
२. मा. राज्य मंत्री (कृषि) यांचे स्वीय सहायक ,मंत्रालय, मुंबई.
३. मा.विरोधी पक्ष नेता ,विधानसभा ,विधानमंडळ सचिवालय ,मुंबई
४. मा.विरोधी पक्ष नेता ,विधानपरिषद ,विधानमंडळ सचिवालय ,मुंबई
५. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई
६. अपर मुख्य सचिव (नियोजन), नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
७. अपर मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग ,मंत्रालय, मुंबई
८. सचिव (कृषि) ,कृषि व पदुम विभाग ,मंत्रालय, मुंबई.
९. आयुक्त (कृषी), कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१०. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ, अकोला.
११. संचालक (विस्तार व प्रशिक्षण), कृषी आयुक्तालय, साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे.
१२. सर्व विभागीय कृषी सहसंचालक
१३. सर्व जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी
१४. महालेखाकार (स्थानिक निकाय लेखा परिक्षा व लेखा), मुंबई.
१५. महालेखापाल (लेखा परिक्षा), महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपुर
१६. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपुर
१७. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी, महाराष्ट्र राज्य
१८. सहायक संचालक (लेखा-१), कृषी आयुक्तालय, पुणे
१९. वित्त विभाग (कार्या. व्यय-१ / अर्थसंकल्प - १३), मंत्रालय, मुंबई
२०. निवड नस्ती-४अे.